महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग, मंत्रालय,४ था मजला, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
nirmal.chaudhari@gov.in

क्रमांक:-टिपीबी-४३२३/१४३/प्र.क्र.१२/२०२३/नवि-११ दिनांक:-०९/०३/२०२४

**प्रति,**

**मा. आयुक्त,**
बृहन्मुंबई महानगरपालिका,
महापालिका मुख्य इमारत, फ़ोर्ट, मुंबई- ०१

**विषय** :- Removal and Re-accommodation of tolerated / protected structures falling in aligment of roads under Reg. 33(12)(B) of DCPR-2034.

**संदर्भ** :- १) मे. क्रेडाई-एमसीएचआय यांचे शासन नगर विकास विभागास पत्र दि.२४/०४/२०२३.
२) प्रमुख अभियंता (वि.नि.) बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र.२४४६३/Gen. दि.१८/०१/२०२४.

**महोदय,**

संदर्भित पत्रांचे कृपया अवलोकन व्हावे.

सदर प्रकरणी, अर्जदार मे. क्रेडाई-एमसीएचआय यांचे संदर्भ क्र.१ मधील विनंतीचे अनुषंगाने बृहन्मुंबई महापालिकेचे संदर्भ क्र.२ चे पत्र प्राप्त झाले आहे. त्यानुषंगाने, सदर प्रकरणी आपणांस खालीलप्रमाणे कळविण्याचे मला आदेश आहेत:-

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्याचे संरेखनातील (alignment) टॉलरेटेड/ संरक्षीत बांधकामाचे निष्कासन करुन इतरत्र पुनर्वसन कारण्यासंबंधीच्या विनियम ३३(१२)(B) च्या तरतूदी हया स्वयंस्पष्ट आहेत. महापालिकेचे मंजूर विकास योजना, रस्ता नियमित रेषा (R.L.), विद्यमान रस्ते इत्यादी चे संरेखनातील संरक्षित बांधकामाचे निष्कासन करुन रस्ता मोकळा करणे, तथापि असे करताना तेथील अशा संरक्षित बांधकामामध्ये वास्तव्य करणाऱ्या संरक्षित रहिवाशांना पर्यायी पुनर्वसन सदनिकेत पुनर्वसन करण्याचे अनुषंगाने सदर विनियम ३३(१२)(B) मध्ये तरतुदी /अटी नमूद करण्यात आल्या आहेत. विनियम ३३(१२)(B) मधील तरतुदीनुसार रस्त्याचे संरेखनातील संरक्षित बांधकामे निष्कासित करुन त्या बदल्यात / संबंधीतांना पुनर्वसन सदनिका देण्यासंबंधीच्या तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे. तथापि, विनियम ३३(१२)(B) मध्ये समाविष्ट/ उल्लेखीत नसलेल्या/ निर्देशित नसलेल्या बाबी जसे की प्रकल्प बाधितांना देण्यात येणाऱ्या सदनिकांचे हस्तांतरण/ विक्री, एकत्रिकरण इत्यादी बाबत महापालिकेने घेतलेल्या लिगल ओपिनीयन नुसार आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी कार्यवाही करणेस हरकत नाही.

आपला,

(अमर पाटील)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत**:- १. मे. क्रेडाई-एमसीएचआय, मेकर भवन II, ४ था मजला, १८, न्यू मरीन लाईन्स, मुंबई- ४०० ०२०.
२. निवड नस्ती (नवि-११)